| MHGO040005512020 | | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांच्या न्यायालयात, ता. आमगांव.<br>(पिठासीन अधिकारी श्री ए. आर. जोशी)<br>**[न्यायनिर्णय दि.०५/०५/२०२६]**<br>**नि.फ़ौ.ख.क्र. ५७/2020**<br>**कालावधीःव.०५,म.१०,दि.१६. नि. क्र. ३२**<br>( गुन्हा क्र. ५५/२०२०, पोलीस स्टेशन, सालेकसा) |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | **महाराष्ट्र सरकारतर्फे**<br>पोलीस स्टेशन, सालेकसा,<br>ता. सालेकसा, जि. गोंदिया. |
| सहा. सरकारी वकील | | **विधिज्ञ श्री एम. के. बोरीकर.** |
| आरोपी | १.<br><br>२. | **प्रेमलाल चंदन धामडे,**<br>वयः ३५ वर्षे,व्यवसाय – शेती,<br>**कमलेश नोखराम लिल्हारे,**<br>वयः २३ वर्षे,व्यवसाय – मजुरी,<br>दोन्ही रा. मुंडीपार ता. सालेकसा जि. गोंदिया |
| आरोपीं क्र. १ व २ तर्फे वकील | | **विधिज्ञ श्री एम. एच. उपराडे.** |

| | |
|---|---|
| घटना घडल्याचा दिनांक | दि.०४.०३.२०२०. |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | दि.०५.०३.२०२०. |
| फिर्यादची तारीख | दि.०५.०३.२०२०. |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | दि.१९.०६.२०२०. |
| फिर्याद दाखल तारीख | दि.१९.०६.२०२०. |
| आरोपीवर दोषारोप ठेवल्याची तारीख | दि.३०.०७.२०२४. |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | दि.०८.०७.२०२५. |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णय तारीख | दि.०५.०५.२०२६. |

| | |
|---|---|
| आरोपीला शिक्षा सुनावल्याची तारीख | -- |

## आरोपीची माहिती

| | |
|---|---|
| आरोपी क्र. १ चे नाव | प्रेमलाल चंदन धामडे, |
| आरोपी क्र. २ चे नाव | कमलेश नोकराम लिल्हारे, |
| अटकेची तारीख | -- |
| आरोपीला जामिनावर सोडल्याची तारीख | दि. १९.०६.२०२०. |
| दोषारोप | भा.दं.वी. कलम-३२४, ५०४,५०६ प्रमाणे. |
| शिक्षा देण्यात आली कि निर्दोष सोडण्यात आले | निर्दोष सोडण्यात आले. |
| देण्यात आलेली शिक्षा | -- |
| आरोपी केस दरम्यान किती दिवस तुरूंगात होता | -- |

## साक्षीदारांची यादी / बचावपक्ष / कोर्ट साक्षीदार

**अ) अभियोगपक्ष :**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच) |
|---|---|---|
| अ.सा.१ | गुमानसिंग हनुमानसिंग उपराडे, | घटनास्थळ व जप्ती पंच सा. क्र. ०१ (नि. क्र. २० ) |
| अ.सा.२ | धुपलाल कनेर उपराडे, | घटनास्थळ व जप्ती पंच सा. क्र. ०२ (नि. क्र. २१ ) |
| अ.सा.३ | टेकराम लालदास लिल्हारे, | फिर्यादी सा. क्र. ०३ (नि. क्र. २५ ) |
| अ.सा.४ | फागुलाल चिखले, | प्रत्यक्षदर्शी सा. क्र. ०४ (नि. क्र. २६ ) |

**ब) बचावपक्ष :**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट साक्षीदार:**

| साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट निशाणी क्र.**

अ) अभियोगपक्ष

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ब) बचावपक्ष

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क) कोर्ट

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ड) मुद्देमाल

| क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## :: न्या य नि र्ण य ::

## (दिनांक ०५ मे २०२६ रोजी घोषीत)

प्रस्तुतचा खटला भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये आरोपींविरुध्द दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीपक्षाचे वतीने मांडण्यात आलेली वस्तुस्थीती खालीलप्रमाणे :

०२. फिर्यादी टेकराम लालदास लिल्हारे यांनी अशी फिर्याद दिली आहे की, दिनांक

०४.०३.२०२० रोजी सायंकाळी ०४:०० वाजेच्या सुमारास मौजा मुंडीपार ता.सालेकसा जि. गोंदिया येथे पैशाच्या वादावरुन आरोपींनी फिर्यादीसोबत अश्लील शब्दात शिवीगाळ करुन भांडण केले व आरोपी क्र. १ याने आपल्या हातातील उभारीने त्याला डोक्यावर मारले तेव्हा मध्यस्ती करण्याकरीता त्याची पत्नी नामे निर्मलाबाई आली असता तिला सुद्धा आरोपी क्र. १ ने हातावर उभारीने मारहाण करुन जखमी केले. म्हणून फिर्यादीने पोलीस ठाणे, सालेकसा येथे आरोपींविरुद्ध तोंडी फिर्याद दिली.

०३. सदर फिर्यादीवरुन सालेकसा पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ५५/२०२० दाखल झाला व गुन्ह्याचा तपास पो. ना. गुलाबदास तुरकर यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान, त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा, जप्तीपत्रक, साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली व तपासात आरोपींने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्याच्याविरुध्द तपासाअंती दोषारोपत्र दाखल केले.

०४. या न्यायालयाने आरोपपत्रावरुन दखल घेऊन आरोपींविरूध्द भा. दं. वि. कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये दोषारोप नि. क्र. १७ अन्वये निश्चित केले. आरोपीने दोषारोप मान्य नसल्याचे कळविले आहे व संपरीक्षेची मागणी केली.

०५. मी अभियोगपक्षाचे व आरोपीच्या वतीने त्यांचे विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकले व न्यायपटावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझेपुढे काही मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे मी माझे निष्कर्षासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ०४.०३.२०२० रोजी सायंकाळी ०४:०० वाजेच्या सुमारास मौजा मुंडीपार ता.सालेकसा जि. गोंदिया येथे आरोपींनी फिर्यादीसोबत अश्लील शब्दात शिवीगाळ करुन भांडण केले व आरोपी क्र. १ याने आपल्या हातातील उभारीने फिर्यादी व त्याची पत्नीला मारुन गंभीर जखमी केले ? | नकारार्थी. |
| **२.** | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी शांतताभंग घडवून आणण्याच्या हेतुने व | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | फिर्यादी व त्याची पत्नीने अपराध करावा, या उद्देशाने शिवीगाळ करुन अपमानीत केले ? | |
| **३.** | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी व त्याची पत्नीस जिवे मारण्याची धमकी दिली ? | नकारार्थी. |
| **४.** | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

०६. अभियोगपक्षाने खटल्याच्या पृष्ट्यर्थ एकुण चार साक्षीदार तपासले आहे. पंच सा. क्र. १ गुमानसिंग हनुमानसिंग उपराडे यास नि. क्र. २० वर, पंच सा. क्र. २ धुपलाल कनेर उपराडे यास नि. क्र. २१ वर, फिर्यादी सा. क्र. ३ टेकराम लालदास लिल्हारे यास नि. क्र. २५ वर आणि सा. क्र. ४ फागुलाल रमेशलाल लिल्हारे यास नि. क्र. २६ वर साक्ष नोंदविली. अभियोगपक्षाने नि. क्र. २७ वर पुर्शिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. तसेच अभियोगपक्षाच्या साक्षीपुराव्यात आरोपीविरुद्ध काहीही आले नसल्याने, नि. क्र. १ वर आदेश पारित करुन, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपीचे निवेदन वगळण्यात आले.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करिताः</u>–**

०७. प्रस्तुत खटल्यात पंच सा. क्र. १ गुमानसिंग हनुमानसिंग उपराडे यास आणि पंच सा. क्र. २ धुपलाल कनेर उपराडे यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा निसंशयरित्या सिद्ध झालेला नाही. याशिवाय फिर्यादी सा. क्र. ३ टेकराम लालदास लिल्हारे यांच्या पुराव्याचा अवलोकन केले असता घटना कशी घडली व केव्हा घडली हे त्यांना माहित नाही. फिर्यादवर त्यांची सही आहे परंतु त्यातील मजकूर त्यांना माहित नाही. तसेच फिर्यादी सा. क्र. ३ टेकराम लालदास लिल्हारे आणि सा. क्र. ४ फागुलाल रमेशलाल लिल्हारे यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, आरोपी व त्यांच्यामध्ये समझोता झालेला आहे व त्याकरिता पुरसीस नि. क्र. २४ वर आहे.

०८. एकंदरीत पुरावयाचा अवलोकन केले असता अभियोगपक्षातर्फे तपासण्यात

आलेले साक्षदारांनी त्यांना सहकार्य केले नाही. तसेच फिर्यादी सा. क्र. ३ टेकराम लिल्हारे यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादीस तथाकथितरित्या शिवीगाळ करुन मारहाण केले ही बाब उपलब्ध पुराव्यातनु स्पष्ट होत नाही. महत्वाची बाब म्हणजे फिर्यादी व आरोपीमध्ये समझोता झालेले आहे असे फिर्यादीने त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे. त्याकरिता समझोता पुरर्शिस नि. क्र. २४ वर दाखल केले आहे. अशा परिस्थितीत आरोपींनी प्रस्तुत प्रकरणातून निर्दोष मुक्त करणे योग्य व संयुक्तिक होईल, असे माझे स्पष्ट मत आहे. परिणामी, मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ४ करिताः–**

०९. प्राप्त परिस्थिती व मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष लक्षात घेवून मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र. १ **प्रेमलाल चंदन धामडे** व आरोपी क्र. २ **कमलेश नोखराम लिल्हारे** यांना भारतीय दंड विधान संहिता कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये गुन्ह्याच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ अन्वयेची पुर्तता केली आहे.

३. जप्त मुद्देमाल म्हणजे, एक पांढऱ्या रंगाचा फुलबाहीचा शर्ट, एक मळकट पांढऱ्या रंगाचा फुलबाहीचा शर्ट व एक लाकडी काठी मुल्याहीन असल्याने अपील कालावधी नंतर नष्ट करण्यात यावे.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.05.05 15:12:13 +0530

[ ए. आर. जोशी ]

दिनांकः– ०५.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.